जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १०.१२.२०२४**

**''राबोडी पोलीसांकडून ४० मोबाईल फोन हस्तगत करून मुळ मालकांस परत ''**

राबोडी पोलीस ठाणे येथे सन २०२४ मध्ये मोबाईल फोन हरविलेबाबतच्या मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राबोडी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबोडी पोलीस ठाण्याच्या नेमणुकीतील मपोहवा/६७२५ यशोदा घोडे, पोहवा. /२४५८ सशांक सांवत, पोना/७२६१ समाधान माळी यांनी हरविलेल्या मोबाईल फोनचा शोध घेणेकरीता तसेच मोबाईल फोनसंबंधीची माहिती मिळणेकरीता संबंधित मोबाईल फोन कंपनीचे सर्व्हिस प्रोव्हायडर यांचेशी पत्र व्यवहार करून, संबंधित मोबाईल फोन कंपनीकडुन मोबाईल फोनसंबंधीची तांत्रिक माहिती प्राप्त करून तसेच सीईआयआर प्रणालीने शोध घेतला होता.

त्यादरम्यान एकुण ४० मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. त्याची एकुण किंमत ४,१०,०००/- असुन सदर चे मोबाईल फोन हे आज दिनांक १०.१२.२०२४ रोजी मोबाईल फोनचे संबधित मालक यांना पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ०१, ठाणे शहर श्री.शशिकांत बोराटे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त नौपाडा विभाग, ठाणे शहर श्रीमती प्रिया देविदास डमाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.हेमंत चंद्रकांत पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा भोये, राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांच्या हस्ते राबोडी पोलीस स्टेशन येथे परत करण्यात आले आहेत.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर